प्रसिद्धी : दरमहा १५ तारखेस    दि यशवंत बँक फलटणचे मुखपत्र    RNI No. MAHMAR/2010/31891

# यशवंत इन हाऊस

YASHWANT IN HOUSE

• फलटण जि. सातारा. • वर्ष १२ वे • अंकः २ ला • फेब्रुवारी २०२२ • पृष्ठ १६ • किंमत : रूपये ५/-



मेरी आवाज ही, पहचान है
गर याद रहे...

गानसम्राज्ञी
'भारतरत्न'

## लता मंगेशकर

**भावपूर्ण श्रध्दांजली**

वर्ष ११ वे

## यशवंत महोत्सव २०२२

दिनांक १ मार्च ते ६ मार्च २०२२

रोज सायंकाळी ६.३० वा.

सादरकर्ते
राष्ट्रीय कीर्तनकार
ह.भ.प. पंडित चारूदत्तबुवा आफळे



सलग सहा दिवस घरबसल्या पाहुया
ऑनलाईन युट्यूबद्वारे

**हनुमान कथा**

सस्नेह निमंत्रण



**आयोजक : दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण**

कार्यक्रमाची लिंक मिळवण्यासाठी आपला मोबाईल नंबर नजीकच्या शाखेत नोंद करावा.

अंतरंग

| १) मुखपृष्ठ | २) संकल्प | ३) मनाचे श्लोक | ४/५) बँकिंग साक्षरता | ६) बँकिंग साक्षरता | ७) दिनविशेष | ८) सहकार विद्यापीठ
| ९) दिनविशेष | १०/११) कथा | १२) वाचकांचा पत्रव्यवहार | १३/१४) क्षणचित्रे | १५) ठेव योजना | १६) कर्ज योजना





रजि.नं.एस्.ए.टी./बी.एन.के./२७ दि. १२/६/१९७५

# दि यशवंत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, फलटण.

## संकल्प २५ कोटी ठेव संकलनाचा

**नवीन वर्ष, नवीन संकल्प**

**संकल्प २५** कोटी ठेव संकलनाचा

"बँकेतील प्रत्येक ठेवीदारास रू. ५ लाखापर्यंतचे ठेव विमा संरक्षण सुरू झाल्याने याचा लाभ घेऊन आपण या संकल्पात सहभागी व्हावे, ही विनंती."

'अ' वर्ग सभासद किंवा जेष्ठ नागरीक यांना १ वर्ष व त्यापुढील कालावधीकरीताच्या ठेवींना ०.२५ टक्के जादा व्याजदर

आपली बँक, दि यशवंत बँक..!

| तपशील | ३१ मार्च २०२० | ३१ मार्च २०२१ |
|---|---|---|
| ठेवी | १६३ कोटी | १८९ कोटी |
| कर्जे | १२५ कोटी | १४४ कोटी |
| भांडवल पर्याप्ता (CRAR)-आदर्श प्रमाण ९ % | १२.८७% | १२.५७% |
| लेखापरीक्षण - सलग ९ वर्षे 'अ' वर्ग | 'अ' | 'अ' |

आपली बँक, दि यशवंत बँक, यशवंत बँक, सुरक्षित बँक

आपली बँक, दि यशवंत बँक..!

रिकरिंग ठेव (R.D) खात्यावर मुदतीनंतर मिळणाऱ्या रकमेइतके अपघाती विमा संरक्षण देणारी एकमेव बँक, यशवंत बँक..

आपली बँक, दि यशवंत बँक..!

**एकत्रीत व्यवसाय ३५० कोटींकडे...**

| आर्थिक वर्ष | एकत्रीत व्यवसाय |
|---|---|
| २०१०-११ | ३५ कोटी |
| २०२०-२१ | ३५० कोटी |

**दहा वर्षात व्यवसाय झाला १० पट**

सर्व सभासद, ठेवीदार व ग्राहकांचे मनःपूर्वक आभार..!

बँकेचे मुखपत्र

**यशवंत इन हाऊस**

गेल्या ११ वर्षापासून नियमित प्रकाशन

दरमहा बँकेचा पारदर्शक आढावा प्रकाशित



आपली बँक, दि यशवंत बँक..!

भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण (CRAR)

RBI नुसार आदर्श प्रमाण ९%

२०१९ - १३.१३%

२०२० - १२.८७%

२०२१ - १२.५७%

आपली बँक, दि यशवंत बँक..!

व्यवसाय विकास अधिकारी यांचे मार्फत ग्राहकांना

**घरपोहोच बँकिंग सेवा**

ज्येष्ठ नागरिकांना

**विशेष योजना व व्याजदर**

आपली बँक, दि यशवंत बँक..!

"आपली गुंतवणूक सुरक्षितता केवळ बँकेतच, कारण येथे आहे कुटुंबातील प्रत्येकाला, रूपये ५ लाखांचे ठेव विमा संरक्षण..."

आपली बँक, दि यशवंत बँक..!

"**यशवंत बँक नेहमीच जपते, आपली सामाजीक बांधिलकी**"

आपली बँक, दि यशवंत बँक..!

- लॉकडाऊन काळात १००० कुटूंबांना धान्य वाटप.
- गरजु कुटूंबांना औषधोपचाराची मदत.
- ज्येष्ठ नागरिकांना अल्पदरात लॅबोरेटरी सेवा.
- यशवंत सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन.

बँकेस सलग ९ वर्षे शासकीय लेखापरिक्षणात वर्ग 'अ' प्राप्त होण्याची परंपरा कायम...

आर्थिक वर्ष २०२०-२१ साठीही मिळाला लेखापरिक्षण वर्ग 'अ'

आपली बँक, दि यशवंत बँक..!

"मधुमित्र ठेव योजनेत डायबेटिक ग्राहकांना दरमहा मोफत तपासणी सुविधा देणारी एकमेव बँक, यशवंत बँक..."

आपली बँक, दि यशवंत बँक..!

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेला अथवा ग्राहक सेवा केंद्राला भेट द्या...

**प्रति,**

**सन्माननीय सभासद, ग्राहक व हितचिंतकांना,**

**सस्नेह नमस्कार.**

दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटणला सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात **३.२५ कोटी इतका** ढोबळ नफा झाला आहे. ३१ डिसेंबर २०२१ अखेर बँकेचा एकत्रित **व्यवसाय ३४० कोटी** इतका झाला असून यामध्ये **ठेवी १९० कोटी तर १५० कोटींचे कर्ज** वितरीत केली आहेत. बँकेची **गुंतवणूक रू. ४५ कोटी** इतकी आहे. लॉकडाऊन काळात बाजारपेठेत मंदीचे वातावरण राहूनही बँकेने नफा मिळवण्यात सातत्य राखले आहे.

बँकेचे कार्यक्षेत्र सातारा, सांगली, पुणे, रत्नागिरी व सोलापूर या जिल्ह्यांचे असून सभासद व ठेवीदारांनी उत्तम प्रतिसाद दिल्याने बँकेच्या भागभांडवलात व व्यवसायात समाधानकारक वाढ झाली आहे. लेखापरीक्षण वर्गात सातत्य राखण्यासाठी आवश्यक प्रमाणके बँकेने पूर्ण केली आहेत. याचमुळे **सलग ९ वर्षे बँकेस लेखापरीक्षणात 'अ' वर्ग** मिळाला आहे.

सामान्य नागरिक, ज्येष्ठ नागरिक, पतसंस्थांसाठी ठेवीच्या व कर्जांच्या ज्या आकर्षक योजना मागील वर्षात बँकेने राबविल्या त्यास ग्राहकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

महिला बचत गट कर्जे, महिला गृहउद्योग, उत्पादने विक्री केंद्रे, व्यवसाय मार्गदर्शन यासारख्या विविध कार्यक्रमांबरोबरच यशवंत महोत्सवासारख्या सांस्कृतिक उपक्रमातून बँकेने आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे.


बँकेतील ठेवीला आता **रू. ५ लाखांपर्यंत विमा संरक्षण** मिळाले आहे. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या गुंतवणुकीला स्वतंत्रपणे रू.५ लाखांचे विमा संरक्षण उपलब्ध आहे.

नव्या वर्षात बँकेने आपल्या सभासदांसाठी व ग्राहकांसाठी आकर्षक व्याजदराच्या अनेक ठेव योजना जाहिर केल्या आहेत. या ठेव योजनेतील आपली गुंतवणूक नक्कीच फायदेशीर ठरणार आहे. आपण जरूर ती करावी. बँकेच्या या **२५ कोटी ठेव वृध्दी संकल्प अभियानास** प्रतिसाद द्यावा. आपला यशवंत बँकेशी ऋणानुबंध आहेच, तो वृध्दिंगत व्हावा, ही विनंती.

**(शेखर सुरेश चरेगांवकर)**
**अध्यक्ष**
**दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण**


- **रजि. कार्यालय** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रविवार पेठ, फलटण - 415 523, जि. सातारा. 8408802022
- **शाखा कराड** : 69, शिराळकर सदन, चावडी चौक, गुरूवार पेठ, कराड. 7875558491
- **शाखा सातारा** : सि. स. नं. 246, सोमवार पेठ, माजगांवकर वाडा, तांदुळ आळी, सातारा. 9049633555
- www.yashwantbank.com admin@yashwantbank.com



समर्थ रामदास स्वामी रचित

# ॥ मनाचे श्लोक ॥

समर्थांच्या मते माणसाने दुसऱ्याला उपदेश करण्यापेक्षा स्वतः सुधारावे, स्वतःमध्ये बदल घडवून आणावा आणि इतरांना मदत करावी. जीवन आनंदाने कसे जगावे आणि सर्वांशी प्रेमाने कसे वागावे याची कला शिकविणारा ग्रंथ म्हणजे मनाचे श्लोक होय. समर्थ रामदास रचित

"मनाचे श्लोक" अर्थासहित मालिका – भाग १७

*जय जय रघुवीर समर्थ ।*

श्लोक क्र. ८६

मुखीं राम विश्राम तेथेंचि आहे ।
सदानंद आनंद सेवोनि राहे ।
तयावीण तो सीण संदेहकारी ।
निजधाम हें नाम शोकापहारी ।।

ज्याच्या मुखात राम–नाम असते, त्याच्या हृदयात समाधान असते. त्याला नेहमी आनंद लाभतो. ते सोडून केलेला सर्व खटाटोप हा संशायास्पद असतो. परंतु नाम हे रामाचे घर आहे. तेथे तो नांदतो, म्हणून नाम हे शोक दूर करणारे आहे.

श्लोक क्र. ८७

मुखीं राम त्या काम बाधूं शकेना ।
गुणें इष्ट धारिष्ट त्याचें चुकेना ।
हरीभक्त तो शक्त कामास मारी ।
जगीं धन्य तो मारूती ब्रह्मचारी ।।

ज्यांच्या मुखात राम–नाम असते त्याला काम–वासना बाधू शकत नाही. त्या मनुष्यास आपल्या सदगुणांमुळे काम–विकाराशी लढण्याचे धैर्य प्राप्त होते. जो भगवंतांचा भक्त असतो तो काम–विकारास मारण्यास समर्थ असतो. असा ब्रह्मचारी मारूती हा जगामध्ये धन्य होय.

श्लोक क्र. ८८

बहू चांगलें नाम या राघवाचें ।
अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें ।
करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें ।
जिवां मानवां हें चि कैवल्य साचें ।।

रामनाम हे फार चांगले आहे. ते मोठे सुंदर, छोटे, सोपे व बिनखर्चाचे आहे. त्यामुळे संसार–तापाचा समूळ नाश होतो. मानवी जीवांना रामनामामुळे मोक्ष मिळतो.

श्लोक क्र. ८९

जनीं भोजनीं नाम वाचे वदावें ।
अती आदरें गद्य घोषें म्हणावें ।
हरीचिंतनें अन्न जेवीत जावें ।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ।।

समाजात वावरत असताना व भोजन करताना मुखाने रामनाम घ्यावे. ते आदरपूर्वक, स्पष्ट व मोठ्याने म्हणावे. भगवंताचे चिंतन करीत अन्न सेवन करीत जावे. असे केल्यामुळे सहजपणे भगवंताची प्राप्ती होते.

श्लोक क्र. ९०

न ये राम वाणी तया थोर हाणी ।
जीं वेर्थ प्राणी तया नाम काणी ।
हरीनाम हें वेदशास्त्रीं पुराणी ।
बहू आगळें बोलिली व्यासवाणी ।।

ज्याच्या वाणीमध्ये रामाचे नाम येत नाही, त्याचे अतोनात नुकसान होत असते. अशा मनुष्याचे जीवन व्यर्थ असते. ते कुचकामी असते. वेदशास्त्रामध्ये व पुराणांमधून रामनाम हे श्रेष्ठ असल्याचे महर्षी व्यासांनी सांगून ठेवले आहे.



बँकिंग साक्षरता

# अज्ञान ग्राहकांचे खाते व्यवहार

**प्रश्न १) अज्ञान व्यक्तीच्या नावे बँकेत व्यवहार करताना काय काळजी घ्यावी ?**

**प्रश्न २) अज्ञान व्यक्तिच्या नावे ठेव ठेवता येते का? अशा प्रकारच्या ठेवीवर कर्ज घेता येते का?**

उत्तर: वरील सर्व प्रश्न वेळोवेळी बँकांमध्ये दैनंदिन व्यवहारात विचारले जातात यावेळी बँकेतील सेवक, अधिकारी वर्ग तसेच ग्राहकांनाही याबाबतीत सविस्तर माहिती देण्याच्या उद्देशाने खालील खुलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.

करारक्षम व्यक्ती बँकेमध्ये खाते व्यवहार करताना अनेक कायदे लागू होतात. त्यापैकी महत्वाचा कायदा म्हणजे भारतीय कराराचा कायदा इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट १८७२. बँकेमध्ये ठेव खाते उघडावयाचे असो अथवा कर्ज घ्यावयाचे असो, डिमांड ड्राफ्ट खरेदी करावयाचा असो अथवा लॉकर घ्यावयाचा असो कराराचा कायदा मदतीला येतो. या कायद्याने करार करण्यासाठीची जी पात्रता निश्चित केलेली आहे त्यापैकी एक म्हणजे करार करणाऱ्या व्यक्तीचे वय इंडिअन मायनॉरिटी ॲक्ट १८०५ नुसार १८ वर्ष पूर्ण झालेल्या व्यक्तीस सज्ञान समजण्यास येते. करार करण्यासाठी व्यक्ती सज्ञान असणे म्हणजेच तिच्या वयाची किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. वयाची १८ वर्षे पूर्ण होण्याआधीच जर कोर्टाने गार्डीयन पालनकर्ता ठरवला तर मात्र हे वय २१ वर्षे होते. जो पर्यंत एखादी व्यक्ती वयाची १८ अथवा २१ वर्षे पूर्ण करत नाही तोपर्यंत त्याला कोणताही करार आर्थिक व्यवहार करण्यासाठी कायद्याने परवानगी नसते.

## अज्ञान व्यक्तीचे नावे व्यवहार करताना

१) अज्ञान ग्राहकाचे वतीने त्याचा पालनकर्ता असे खाते उघडू शकतो. कायद्याप्रमाणे वडील पालनकर्ता या नात्याने खाते वापरू शकतात. कायदेशीर निवाडे, प्रचलित कार्यपद्धती बँकेचे मार्गदर्शक धोरण विचारात घेता अज्ञान व्यक्तीची आई सुद्धा अज्ञान पालनकर्ती या नात्याने खाते व्यवहार करू शकते. मुस्लीम धर्माच्या खातेदारासाठी मात्र फक्त वडीलच पालनकर्ता या नात्याने खाते वापर करू शकतात.

२) बचतीची सवय निर्माण करण्याचे हेतूने १० वर्षे पूर्ण केलेले अज्ञान ग्राहकाचे बचत खाते उघडण्यासाठी बँका परवानगी देतात. या करता सध्याच्या 'आपला ग्राहक जाणा Know Your Customer (KYC) या संबंधीची सर्व पूर्तता करून घेतली जाते. अज्ञान व्यती सुशिक्षित असणे महत्त्वाचे आहे. या खात्यावर वापर अज्ञान व्यक्ती स्वतः करू शकते. बँका या खात्यावर छोट्या रक्मेची उदा. रु. १,०००/- ची उलाढाल करण्यास परवानगी देतात. निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्ट १८८१ चे कलम २६ नुसार अज्ञान खातेदार चेकचा वापर करू शकतो, परंतु प्रचलित कामकाज पद्धतीनुसार या खात्यांना चेकबुक दिले जात नाही.

३) दुदैवाने पालनकर्ता व्यक्तीचे, अज्ञान खातेदार सज्ञान होण्यापूर्वीच निधन झाल्यास बँका सदर खात्यावरील शिल्लक अज्ञान व्यक्ती सज्ञान झाल्यावर तिला अदा करतात.

४) अज्ञान खातेदाराचे निधन दुर्देवाने अज्ञान खातेदार सज्ञान होण्यापूर्वीच झाल्यास बँका त्याचे खात्यावरील शिल्लक नॅचरल गार्डीयन व्यक्ती वडील किंवा आई यांना अदा करतात. सावत्र वडील किंवा सावत्र आई यांचा समावेश नॅचरल गार्डीयन मध्ये होत नाही.

(५) अज्ञान ग्राहकाने वयाची १८ अथवा २१ वर्षे पूर्ण केल्यावर पालनकर्ता व्यक्तीला खाते वापर करण्याचा अधिकार राहात नाही. अशा सज्ञान ग्राहकांचे वयाचा दाखला व के. वाय.सी. दाखल करून घेऊन खाते वापर करण्यासाठी परवानगी दिली जाते.





६) दोन अज्ञान व्यक्तींचे संयुक्त खाते उघडण्यात येऊ नये. कारण त्यापैकी एक खातेदार सज्ञान झाल्यानंतर खाते वापर व शिल्लक रकमेची मालकी या बाबी क्लिष्ट ठरतात. जर दोन अज्ञान व्यक्तींचे संयुक्त खाते काही विशिष्ट कारणासाठी व थोड्याच कालावधीसाठी उघडावयाचे असल्यास कारण विचारात घेऊन खाते उघडण्यास हरकत नाही. उदा. शाळेतील सहलींच्या निधीचे व्यवस्थापन इ..

७) ठेव तारणावर कर्ज / ओव्हरड्राफ्ट अज्ञान व्यक्तीचे नांवे पालनकर्त्या व्यक्तीचे सहाय्याने मुदत ठेव ठेवली असेल तर त्याचे तारणावर कर्ज/ ओव्हरड्राफ्ट देते वेळी अज्ञान व्यक्तीचे हितासाठी त्याचा वापर होणार आहे याबाबत पालनकर्त्या व्यक्तीकडून प्रतिज्ञापत्र / डिल्करेशन घेऊन मगच मान्यता / वितरण करता येते.

(८) अज्ञान व्यक्तीचे नांवे नॅचरल गार्डीयन व्यक्ती वडील किंवा आई पालनकर्त्या व्यक्तीचे सहाय्याने खाते उघडताना, अन्य सज्ञान ग्राहकाबरोबर संयुक्त खाते उघडण्यास हरकत नाही असे इंडियन बँक्स् असोसिएशन यांच्या धोरणात निर्देशित करण्यात आले आहे. परंतु विशिष्ट कारणासाठी व कालावधीसाठी खाते उघडण्यास हरकत नाही. परंतू, ज्यावेळी अज्ञान खातेदार सज्ञान होईल त्यावेळी खात्यावरील शिक्षक रकमेची मालकी या बाबी क्लिष्ट ठरतील.

९) करपात्र उत्पन्नासंदर्भात अज्ञान व्यक्तीचे नांवावरील मुदत ठेवीवरील व्याजाचे उत्पन्न करपात्र झाल्यास अज्ञान व्यक्तीचे नांवे स्वतंत्र आयकर भरला जात नसल्यास त्याचे नॅचरल गार्डीयन व्यक्ती-वडील किंवा आई या पालनकर्त्या ग्राहकांचे उत्पन्नात त्याची मिळवणी केली जाते.

(१०) बँकेच्या कर्जदारांपैकी काही कर्जदार भागीदार असतील व त्यापैकी कोणी भागीदार अज्ञान असेल तर त्या भागीदाराला पार्टनरशीप ॲक्ट १९३२ कलम ३० नुसार फक्त नात सहभागी होता येते. कर्ज जबाबदारी नसते, त्यामुळे बँकेला कर्ज करारावर अज्ञान भागीदाराची सही घेता येत नाही व त्याला कर्ज परत फेडीसाठी जबाबदारही धरता येत नाही.

वरील प्रकारे योग्य ती दक्षता घेऊन अज्ञान व्यक्तींचे आपल्या बँकेत करता येतात. यामुळे अज्ञान व्यक्तींचे व्यवहार आपोआपच वाढून यांना लहानपणापासूनच बचतीची सवय लागू शकते व हेच अज्ञान ग्राहक भविष्यात सज्ञान झाल्यावर अन्य बँकांकडे ना आपल्याचे बँकेला मोठा व्यवसाय देऊ शकतात. यासाठी सहकारी बँकांबरोबरच राष्ट्रियकृत बँकांमध्ये 'Junior' या नावाने सेव्हिंग्ज खाती उघडणेसाठी मोठ्या प्रमाणावर मोहिम राबविली आहे. ★★★

आपल्या यशवंत बँकेतही लहान मुलांना बँकिंग व्यवहारांचा अनुभव यावा यासाठी
वय वर्षे १० ते १८ या वयोगटातील मुलामुलींसाठी 'चिरंजीवी'
ही झिरो बॅलन्स बचत खाते योजना सुरू आहे.

"यशस्वी होण्यासाठीची तुमची इच्छा
हि अपयशी होण्याच्या भीतीपेक्षा
जास्त प्रबळ असली पाहिजे."



# हिंदू अविभक्त कुटुंब

## स्त्री कोपार्सनस



प्रथम कुटुंबप्रमुख पुरुषच असतो. त्यास 'कर्ता' म्हणतात. कर्त्यांच्या अपत्यांस (पुत्र किंवा कन्या) कोपार्सनर्स म्हणतात, कल्पनंतर कोपार्सनरला कर्ता बनण्याचा चान्स असतो. कर्त्याच्या पत्नीस मेंबर म्हटले जाते. स्त्रीधन हे पूर्णपणे महिलेच्याच मालकीचे असते. कुटुंबातील सदस्यांच्या सहमतीने ज्येष्ठता अधिकाराऐवजी सक्षम 'कर्ता' होवू शकतो. मुघल शासक बाबरच्या कारकीर्दीपूर्वी कुटुंबातील कन्यादेखील व्यवसाय सांभाळीत असे. दशरथ कन्या 'शांता' आणि पांडव माता 'कुंती असे कन्या दत्तक विधानाची उदाहरणे आहेत. अर्जुन पत्नी चित्रगंधा फणीपूर राज्याची धुरा सांभाळत असे. प्रभू रामचंद्र वनवासात निघाले तेव्हा गुरु वसिष्ट यांनी सीतामाता राज्य कारभार करण्यास सक्षम असल्याचे सुचवले मेंबर (पत्नी किवा सून) पेक्षा कन्या कोपार्सनर्सला हिंदू वारसा कायद्यात जास्त अधिकार आहेत.

विधवा मेंबरला तिच्या पतीनिधनानंतर पतीचे सर्व अधिकार मिळतात. छत्रपती शिवरायांनी अशा न्यायदानासाठी जावळीचे मोरे आणि रांझे पाटील यांना अद्दल घडवली. पती निधनानंतर कुटुंब किंवा संस्थानांची सर्व प्रॉपर्टी ब्रिटिश सरकारला जमा करावी असे संस्थान खालसा करण्याचे धोरण लॉर्ड डलहौसीने अवलंबले होते.

उच्च न्यायालयाच्या २२ डिसेंबर २०१५ च्या सुजाता शर्मा विरुद्ध मनू गुप्ता निवाड्यानुसार लग्न झालेठी मुलगी कायमची कोपार्सनर असते या मिताक्षर विचारसरणीला दुजोरा दिला. ह्या निवाड्यात सुजाता शर्मा विवाहित असून ती मनू गुप्ताची आत्या आहे. मे. डी जी गुप्ता अँड सन्स या कुटुंबातून एका पाठोपाठ पाचही वयस्कर मुलांचे निधन झाल्यावर मुळ कर्त्यांचा नातू मनू गुप्ताचा दावा होता की, त्याची आत्या सुजाता दुसऱ्या कुटुंबातील सदस्य आहे. आजोबांच्या हयातीत आत्याला पूर्वीच प्रॉपर्टीचा हिस्सा दिला गेला. न्यायालयाने स्पष्ट केले की 'प्रॉपर्टीतला हक आणि कोपार्सनरशीप' हे दोन वेगवेगळे अधिकार आहेत. विवाहीत कन्या सासरी कितीही श्रीमंतीत नांदत असली तरी कोपार्सनरीचा हक्क तिच्या जन्मानेच मिळाला असतो. म्हणून दुकान चालवण्याचा, व्यवस्थापन करण्याचा अधिकार विवाहित मुलीला दिला. हिंदू वारसा कायद्यात एकत्र कुटुंबाची विभागणी करण्याचा अधिकार फक्त कर्त्याच्या अपत्यास आहे. जोपर्यंत वडील जीवंत आहेत तोपर्यंत नातवंड आजोबाच्या एकत्र कुटुंबाची वाटणी करू शकत नाही.कॉर्पस फंड हिंदू एकत्र कुटुंब नोंदणी खूप सोपे आहे. कॉर्पसचे विभाजन होवून नवीन हिंदू एकत्र कुटुंब तयार होत असते. आयकर कायद्यानुसार एकत्र कुटुंबाच्या अविभाजीत प्रॉपर्टीद्वारे (गृहसंपती) मिळालेले उत्पन्न करदाता त्याच्या वैयक्तिक उत्पन्नात न दाखवता 'एचयूएफ' चे वेगळे उत्पन्न दाखवण्यासाठी स्वसंपादित प्रॉपर्टी नसावी. व्यवसासाठी सुरुवातीला भांडवलाची गरज असते. स्थिर मालमत्ता आणि खेळते भांडवल कर्त्याने त्याच्या व्यक्तिगत खात्यातून आणल्यास क्लाबिंगच्या तरतुदी लागू होतील. गिफ्ट डीड, जुन्या मोठ्या कुटुंबाची पूर्ण वाटणी किंवा मृत्युपत्राने कॉर्पस फंडची उभारणी होवू शकते. टॅक्स प्लॅनिंग करपात्र रकमेची मर्यादा (आकारणी वर्ष २०२१-२२) अडीच लाख असली तरी सेक्शन ८७ओ ची सूट (पाच लाख) हिंदू संयुक्त कुटुंबाला मिळत नाही. एचयूएफ ला प्रोफेशन टॅक्स भरण्याची गरज नाही. कर्त्याला मात्र नोंद क्रमांक २० द्वारे वार्षिक अडीच हजार रुपये प्रोफेशन टॅक्स भरावा लागतो. बचत खात्यावरील व्याज कलम ८० टीटीए नुसार दहा हजार रुपयांची वजावट मिळते. कलम ८० टीटीबीची मुदत ठेवीवरील व्याजाची वजावट फक्त ज्येष्ठ नागरिक वैयक्तिक रीत्याच दाखवू शकतात. आयकर कायद्यात सेक्शन ८० आयबीए हे डिकोडिंगचे हत्यार आहे. परवडणाऱ्या किमतीत स्वप्नातले घरकुल घेता यावे म्हणून सदनिका धारकांना गृहकर्जावरील व्याजाचा आणि बिल्डरला प्रकल्पाचे उत्पन्न करमाफ देण्याचा 'हाऊसिंग फॉर ऑलमचा प्रामाणिक उद्देश आहे. वस्तुस्थिती निराळी आहे. जास्तीत जास्त ॲमेनिटीज आणि लोएस्ट ईएमआय नेहमी शक्य नाही. गृहनिर्माण प्रकल्पात निवासी युनिटची व्याख्या कायम रहावी असे आयकर विभागाला वाटते. कमी क्षेत्रफळात, अल्प काळात सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात बिल्डरकडून एखाद्या अटीचे पालन न झाल्यास डिडक्शनचा परिणाम उलटा होवू शकतो. गृहनिर्माण प्रकल्पातील निवासी युनिट केवळ एका फॅमिलीस देण्यात यावे अशी अट आहे. एकाच मजल्यावरील दोन वेगवेगळ्या सदनिका कुटुंबातील सदस्यांच्या नावाने विकत घेवून पुन्हा दोन किंवा तीन फ्लॅट एकत्र केल्यास मिळणारी सूट रद्द होवू शकेल. येथे घर म्हणजे एकत्र किचन होय.टॅक्स ऑडिट आणि टीडीएसच्या तरतुदी वैयक्तिक करदात्याप्रमाणे लागू असतात. कर्त्याला एचयूएफ मधून रीतसर योग्य पगार घेता येतो. मात्र कर्त्यांचे ते बिझनेस इन्कम असते. हिंदू एकत्र कुटुंबास कर्त्यांच्या स्वाक्षरीने वस्तू व सेवा कराचे रजिस्ट्रेशन करता येते.पार्टनरशीप मध्ये कर्ता भागीदार होवू शकतो. पण भागीदारीमध्ये एखादा तरी नैसर्गिक पार्टनर पाहिजे. भागीदाराचा मोबदला कर्त्याचे व्यक्तीगत उत्पन्न आहे. संयुक्त हिंदू कुटुंबाकडून भागीदारीत आलेल्या भांडवलावरील व्याज हिंदू कुटुंबाचे व्यावसायिक उत्पन्न समजले जाते. क्रमशः



# १ फेब्रुवारी - तटरक्षक दिन

सागरी तटरक्षक दल भारताच्या सागरी किनाऱ्याचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी स्थापन झालेले लष्करी दल आहे. त्याच्या स्थापनेची घोषणा दिनांक १ फेब्रुवारी १९७७ रोजी झाली आणि केंद्र शासनाने पुढे १९७८ च्या कोस्ट गार्ड अधिनियमाने त्याची विधिवत स्थापना दिनांक १८ ऑगस्ट १९७८ रोजी केली आणि त्यास स्वतंत्र लष्करी दलाचा दर्जा दिला. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी महासंचालक (डायरेक्टर जनरल) या स्वतंत्र पदाची निर्मिती करून त्यांच्याकडे संबंधित खात्याचे सर्वाधिकार सुपूर्त केले.

सागरी तटरक्षक दलाचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे आहे. याशिवाय या दलाचे चार प्रादेशिक विभाग असून, त्यांची मुख्यालये अनुक्रमे मुंबई (महाराष्ट्र), चेन्नई (तमिळनाडू), पोर्ट ब्लेअर (अंदमान व निकोबार बेटे) आणि गांधीनगर (गुजरात) येथे आहेत. ही चार प्रादेशिक मुख्यालये भारताच्या संपूर्ण सागरी किनाऱ्यावर अकरा जिल्हा तटरक्षक दल व सहा तटरक्षक स्थानके (स्टेशन्स) यांच्या सहकार्याने कार्य करतात. त्यांना सागरी किनाऱ्यावर नियमबाह्य वा अनियमित असे काही आढळल्यास तत्काळ योग्य ती कारवाई करण्यात येते. भारतीय सागरी तटरक्षक दलाचे बोधवाक्य 'वयम् रक्षामः' (आम्ही संरक्षण करतो) असे आहे.

अधिनियमांच्या सनदेत तटरक्षक दलाची कर्तव्ये नमूद केली आहेत. ती अशी : (१) समुद्रावरील जीवित व मालमत्ता यांचे रक्षण करणे. (२) किनाऱ्यापासून सागरी सीमेपर्यंत गस्त घालणे. (३) स्वकीय मच्छीमारांना संरक्षण देणे आणि परकीय मच्छीमारांना अटकाव करणे. (४) संशयास्पद जहाजे तपासणे व दुर्घटनाग्रस्त जहाजांना मदत करून त्यांवरील लोकांचे प्राण व संपत्तीचा बचाव करणे. (५) किनाऱ्यावरील जहाजातून तेलगळती होत असल्यास तिचा निरोध करून मासे व जलचरांना वाचविणे तसेच समुद्रात विमान दुर्घटना झाल्यास मदत करणे. (६) कृत्रिम बेटांचे आणि अपतट (ऑफ शोअर) प्रस्थापित तेलसाठे यांची सुरक्षितता व संरक्षण करणे. (७) प्रदूषणाने धोक्यात आलेल्या वनस्पति-जलचर यांच्या जातींचे संरक्षण आणि संवर्धन करून पर्यावरणाचा समतोल साधणे. (८) चोरट्या आयात-निर्यातीवर देखरेख व लक्ष ठेवणाऱ्या सीमाशुल्क व अन्य प्राधिकाऱ्यांना मदत करणे. (९) भारतीय नौदलाला युद्धजन्य परिस्थितीत सहकार्य करणे. (१०) सागरी कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्यांवर लक्ष ठेवणे व गुन्हा नोंदविणे इत्यादी.

भारताचा सागरी किनारा सुमारे ७,५१७ किमी. आहे. यामध्ये पूर्व आणि पश्चिम किनारा, लक्षद्वीप, अंदमान व निकोबार बेटे आणि अन्य लहानसहान अनेक बेटे यांचा अंतर्भाव होतो. या किनाऱ्याच्या संरक्षणाची जबाबदारी तटरक्षक दलावर असून पश्चिमेस व उत्तरेस पाकिस्तानचा किनारा, पूर्वेस बांगला देश आणि म्यानमार या शेजारी देशांशी असलेल्या संबंधांवर तटरक्षक दलाची करडी नजर असते. लहानसहान खाड्यांमधून छोट्या बोटी, शस्त्रास्त्रे, मादक पदार्थ, अतिरेकी वगैरेंची अवैध रीत्या ने-आण करतात. त्यांच्यावर तटरक्षक दलाला लक्ष ठेवावे लागते तसेच भाभा अणुसंशोधन केंद्र, गुजरातमधील आण्विक भट्टी, लहान-मोठी बंदरे, खनिज पदार्थ, ॲल्युमिनियम भट्ट्या, नाविक तळ, विमानतळ इ. संवेदनक्षम स्थळे किनारपट्टीवर आहेत. त्यांच्या संरक्षणाची पूर्ण जबाबदारी तटरक्षक दलावर असून शिवाय सामुद्रिक वादळे व त्सुनामी लाटा यांसारख्या नैसर्गिक आपत्तींत सापडलेल्या संकटग्रस्तांना मदतीचा हात देण्याची जबाबदारी तटरक्षक दलावर आहे.

प्रत्येक देशाच्या सागरी किनारपट्टीला लागून प्रादेशिक जलाशय (टेरिटोरिअल वॉटर्स) हा भाग असतो. प्रादेशिक जलाशयाची मर्यादा किनाऱ्यापासून सुमारे ४४ किमी.पर्यंत असलेल्या जलप्रदेशावर असून





किनाऱ्यापासून ३२० किमी. अंतरापर्यंतचा जलप्रदेश हा त्या त्या देशाचा आर्थिक क्षेत्रविभाग मानला जातो. या क्षेत्रविभागात असलेल्या सर्व प्रकारच्या नैसर्गिक संपत्तीचा शोध लावण्याचा, उपभोग घेण्याचा व संवर्धन करण्याचा हक्क त्या देशाला असतो. या सर्व प्रकारच्या कार्यासाठी सागरी तटरक्षक दल जबाबदार असते. या दलाचा नौसेनेशी घनिष्ठ संबंध असतो. या सीमेत परवानगीशिवाय प्रवेश करता येत नाही. या सागरी प्रदेशावर सुरक्षा, स्वच्छता, वसाहत करणे इ. कारणास्तव तटरक्षक दलाचा हक्क असतो. ह्या दलात लहान-मोठ्या बोटी, जहाजे, किनारपट्टीवर गस्त व टेहळणी करणारी विमाने आणि हेलिकॉप्टर्स असतात. याशिवाय तोफ नौका, नष्टशेषशोधक (सॅल्व्हर), अग्निशामक आणि प्रदूषणनियंत्रक इ. प्रकारच्या नौका या दलाकडे असतात. मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या अतिरेक्यांच्या हल्ल्यानंतर महाराष्ट्रात किनाऱ्यावरील सुरक्षा व्यवस्था अधिक कार्यक्षम करण्याचे प्रयत्न झाले आणि केंद्र शासनाने त्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखला. भारतीय तटरक्षक दलाकडे सुमारे ९३ नौका आणि ४६ विमाने आहेत (सन २०११ नुसार).

खनिज तेलाचे किंवा नैसर्गिक वायूचे साठे जिथे आहेत, त्यांची जबाबदारी खनिज तेल व नैसर्गिक वायू आयोग (ऑइल अँड नॅचरल गॅस कमिशन -ओएनजीसी) घेतो. त्या प्लॅटफॉर्मना रसद पुरविणे, कामगारांची ने-आण करणे, दुरुस्ती इ. कामांसाठी स्वतंत्र यंत्रणा आहे. ती तटरक्षक दलाची जबाबदारी नाही. ★ ★ ★


## वैकुंठभाई मेहता प्रशिक्षण संस्था, पुणे येथे उभारणार देशातील पहिले सहकार विद्यापीठ

- अर्थसंकल्पात झाली ११ कोटींची तरतूद
- पूर्णपणे स्वतंत्र संस्थेत होणार रूपांतर
- प्रशिक्षणासह संशोधनाला चालना
- सहकार शिक्षण प्रचार-प्रसारास गती

अर्थसंकल्पातील या निर्णयाबद्दल पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी
मा. अमितजी शाह, मा. जे.पी. नड्डाजी,
मा. निर्मलाजी सीतारामन, मा. भागवतजी कराड,
या सर्वांचे मनःपूर्वक आभार...!





मा. शेखर चरेगांवकर
अध्यक्ष, दि यशवंत बँक लि., फलटण




# १९ फेब्रुवारी - छत्रपती शिवाजी महाराज

## छत्रपती शिवाजी महाराज काही खास गुणांमुळे होते रयतेचे राजे



रामायण, महाभारतात विविध राजांचे दाखले दिले जातात. हे राजे शूरवीर होते, दानशूर होते, न्यायी होते. पण महान, पराक्रमी राज्यांची परंपरा आपल्याला लाभली असली तरी रयतेचा राजा असं म्हटलं की समोर छत्रपती शिवाजी महाराजांशिवाय दुसरं कुठलं नाव येत नाही. रयतेचा राजा कसा असावा याचा पायंडा छत्रपतींनी रचला आणि त्यापुढे जाण्याची कोणाची टाप नाही. १९फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची तारखेनुसार जयंती आहे. यानिमित्त महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची ती वैशिष्ट्ये जाणून घेऊ, ज्यामुळे त्यांना खऱ्या अर्थाने रयतेचा राजा म्हटले जाते...

### रयतेवर जीवापाड प्रेम–

शिवाजी महाराजांनी आपल्या मावळ्यांवर व रयतेवर जीवापाड प्रेम केले. जाती–पातीच्या भिंती तोडून सर्वांना सन्मान दिला. प्रत्येक मोहिमेनंतर शिवाजी महाराज तलवारी फिरवणाऱ्या धारकऱ्यांना 'मानकरी', भाला फेकणाऱ्या निष्णात सैनिकाचा 'भालेराव' अशी उपाधी देऊन गौरव करायचे. जीवावर उदार होवून चढाई करणाऱ्या सैनिकांना सोन्याचे कडे द्यायचे.

### निर्भिडपणा आणि जिद्द–

आपल्यापेक्षा प्रबळ शत्रुला शिवाजी महाराज कधीही घाबरले नाही. भय हा शब्द महाराजांच्या ध्यानी–मनीही नव्हता. महाराजांची कार्यपद्धती नेमकी असायची. एखादी मोहीम आखल्यानंतर गड उतार झाल्यापासून ते पुन्हा गडावर येईपर्यंत कशी कामे करायची, याचे व्यवस्थापन चोख असायचे. नियोजन करणे, माहिती गोळा करणे, जबाबदाऱ्या निश्चित करणे, यामुळे शिवाजी महाराजांना मोठे यश मिळाले. जिद्दीने, चातुर्याने आणि बुद्धी वापरून शिवाजी महाराजांनी समस्यांवर मात करत प्रचंड यश संपादन केले आणि स्वराज्याची स्थापना केली.

### दूरदृष्टी–

महाराजांना मोठी दूरदृष्टी होती. स्वराज्यासाठी काय काय केले जाऊ शकते, याचा विचार त्यांच्याकडे होता. स्वराज्य स्थापनेनंतर ते विस्तारले कसे जाईल, याचा ते सदैव विचार करायचे. त्यांनी बांधलेले गडकिल्ले हे याचे उत्तम उदाहरण आहे. हे गडकिल्ले इतके अभेद्य असत की शत्रूला त्यावर चाल करून जाताना हजारदा विचार करावा लागे. किल्ल्यांभोवतीची तटबंदी मजबूत असे आणि त्यासाठी किल्ल्यावर केलेल्या खोदकामांतून मिळालेलेच दगड वापरले जाते. त्यामुळे इतक्या उंचावर इतके अभेद्य किल्ले बांधता आले. शत्रूचा धोका जसा जमिनीवर आहे तसाच तो पाण्याच्या बाजूनेही असू शकतो, या दूरदृष्टीतून त्यांनी जलदुर्गांची निर्मिती केली. हा संपन्न वारसा आजही महाराष्ट्र अभिमानाने फिरवत आहे.

### गनिमी कावा–

गनिमी कावा हे शिवाजी महाराजांचे प्रमुख हत्यार होते. अनेक मोहिमा, लढाया शिवाजी महाराजांनी गनिमी कावा करून जिंकल्या. शत्रूचे सैन्य कितीही प्रचंड असले, तरी काही मावळ्यांच्या मदतीने शिवाजी महाराजांनी शत्रूचा पाडाव केला. स्वराज्य स्थापन करताना शिवाजी महाराजांनी शेकडो किल्ले बांधले आणि जिंकले. हिंदवी स्वराज्यात शिवाजी महाराजांकडे ४०० गड–किल्ले होते, असे सांगितले जाते.

### व्यवस्थापन–

स्वराज्य मिळाल्यानंतरही महाराजांचे विविध खात्यांचे नियोजन करणारे अष्टप्रधान मंडळ हे व्यवस्थापनाचे उत्तम उदाहरण आहे. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करताना सुमारे ४०० गड आपल्या अधिपत्याखाली आणले होते. काही गड त्यांनी स्वतः बांधले, तर काही किल्ले लढाया करून जिंकले. महाराजांचा एक एक गड–किल्ला म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतिकच होते.

### न्याय आणि सर्व धर्म समभाव–

हिंदू असूनही शिवाजी महाराजांनी मुस्लिमांशी कधीही दुजाभाव केला नाही. आपली लढाई मुस्लिमांच्या धर्माशी नसून, त्यांच्या साम्राज्याशी आहे, असे शिवाजी महाराज नेहमी आपल्या सहकाऱ्यांना सांगत. शिवाजी महाराजांनी स्वराज्यात स्त्रियांवर अन्याय, अत्याचार व हिंसाचार करणाऱ्यांना व त्रास देणाऱ्यांना कठोर शिक्षेची तरतूद केली होती. महिलांना त्रास देणाऱ्यांना शिवाजी महाराजांनी कडक शासन केल्याची अनेक उदाहरणे देता येतील. शिवाजी महाराजांच्या दरबारात सुनावणीसाठी आलेले प्रकरण तातडीने, समोरासमोर तडीस नेले जायचे. ★★★

कथा

# मी कसा आहे...?

आपल्याच देशातल्या एका सुप्रसिद्ध उद्योगपतींची ही कहाणी आहे. एक दिवस हे उद्योगपती सकाळी तयार होऊन कामाला जाण्यासाठी निघाले होते. तेवढ्यात त्याच्या समोर घरमालक येऊन उभा राहिला. आज कसं येणं झालं..? उद्योगपतींनी त्या माणसाला विचारले. कामाच्या नादात ते विसरून गेले होते की, समोर त्यांचा घरमालक उभा आहे. घरमालक विनम्रपणे म्हणाला,मी भाडं वसूल करायला आलो आहे. दर महिन्याला तुम्ही पाठवता. यावेळेला कामाच्या गडबडीत राहून गेलेलं दिसतं.

उद्योगपती वर आले आणि म्हणाले, हे घ्या तुमचं घरभाडं. उशीर झाल्याबद्दल क्षमा करा. एवढे बोलून उद्योगपतींनी खिशात हात घालून पैसे काढले व घरमालकाला दिले. घरमालक उद्योगपतींना म्हणाला, तुम्ही एवढे मोठे उद्योगपती असून भाड्याच्या घरात राहता,याचे मला आश्चर्य वाटते. यावर उद्योगपती हसले व म्हणाले, मी कोण आहे यापेक्षा मी कसा आहे याला महत्त्व आहे. माझ्याकाही तत्त्वांमुळे मी भाड्याच्या घरात राहतो. घरमालक काही समजला नाही. तो भाडे घेऊन निघून गेला.

हा प्रसंग त्या उद्योगपतींचा ड्रायव्हर पाहत होता. उद्योगपती गाडीत बसले व आपल्या परदेश प्रवासासाठी तिकीट काढायला एका एअरलाईनच्या ऑफिसात गेले. तिथे बरीच गर्दी होती. उद्योगपती एका सामान्य माणसासारखे रांगेमध्ये उभे राहिले..तेवढयात एअरलाईनच्या काही कर्मचाऱ्यांनी त्यांना पाहिले, ते घाईने पुढे आले आणि म्हणाले,सर, तुम्ही रांगेत का उभे आहात..? आम्ही तुमचे तिकीट काढून तुम्हाला आणून देतो. तुम्ही समोरच्या सोफ्यावर आरामात बसा. तुम्ही रांगेत उभे राहून आम्हाला लाजवू नका.

उद्योगपती म्हणाले, आत्ता मी उद्योगपती म्हणून इथे उभा नाही, तुम्ही एवढी धावपळ करण्याची आवश्यकता नाही. 'उद्योगपती' हे माझ्या नावासमोर लावलेले विशेषण आहे. मी कोण आाहे यापेक्षा मी कसा आहे? हे अधिक महत्त्वाचे आहे. एअरलाईनचा स्टाफ हे उत्तर ऐकून चकित झाला.

तिकीट काढून उद्योगपती आपल्या ऑफिसकडे निघाले. रस्त्यात त्यांना अनेक माणसे धावतपळतआपापल्या कार्यालयाकडे जाताना दिसली. त्यांना लाज वाटली की, आपण एवढ्या अलिशान गाडीमधून एकटे प्रवास करीत आहोत. सामान्य माणसे मात्र किती कष्टाने ऑफिसला पोहोचतात. त्या दिवसापासून त्यांनी आपल्या गाडीत लोकांना लिफ्ट द्यायला सुरुवात केली. लिफ्ट मिळालेल्या लोकांचा आनंद पाहून उद्योगपतींना समाधान वाटायचे.

एके दिवशी हे उद्योगपती परदेश प्रवासासाठी निघाले होते. त्या दिवशी एक प्रसंग घडला. हवाई सुंदरीच्या हातून त्यांच्या अंगावर चुकून पेय पडले. त्यामुळे ती घाबरली. तिने पाणी व कपडा आणून त्यांचा ड्रेस स्वच्छ केला. ती त्यांना ओळखत असल्याने तिने शतदा त्यांची क्षमा मागितली. तिला भीती वाटत होती की, या चुकीबद्दल तिला शिक्षा घडणार.. उद्योगपतींनी तिच्याकडे पाहिले व तिला विचारले, तू माझ्या अंगावर काय सांडलेस ?' हवाई सुंदरी भीत भीत म्हणाली, माझ्या हातून तुमच्या कपड्यांवर फळांचा रस सांडला, मला क्षमा करा.उद्योगपती हसले व म्हणाले, पुढच्या वेळेला माझ्या अंगावर सोडा, व्हिस्की सांड. उद्योगपतींचे बोलणे ऐकून हवाई सुंदरी खुदुकन हसली. तिच्या मनावरचा सगळा ताण एका क्षणात उतरला.

असे अनेक प्रसंग उद्योगपतींच्या ड्रायव्हरने पाहिले होते. त्याची उत्सुकता चाळविली गेली. तो उद्योगपतींना म्हणाला, साहेब, तुम्हाला इतके साधे राहणे व वागणे कसे काय जमते..? आम्ही तर अर्ध्या हळकुंडाने पिवळे होतो. तुम्ही एवढे मोठे उद्योगपती असून तुम्ही किती साधे जगता?




उद्योगपती म्हणाले, अरे, मी लहान असताना फार उद्दाम होतो. मला सांभाळायला एक दाई होती. एकदा माझ्या मनाविरुद्ध काही घटना घडली तेव्हा मी तिला चक्क लाथ मारली होती. ते पाहून माझे वडील एवढे संतापले होते की, त्यांनी मला बदडून काढले. ते मला म्हणाले होते, तू कोण आहेस हे बिलकूल महत्त्वाचे नाही; पण.. 'तू कसा आहेस' हे फार महत्त्वाचे आहे. आयुष्यभर माझे हे वाक्य स्मरत रहा.

तेव्हापासून मी वडिलांचे शब्द स्मरत आलो आहे. मला हे पटले आहे की, 'खरोखरच आपण कोण आहोत' हे महत्त्वाचे नसतेच. 'आपण कसे आहोत' यावर आपली किंमत ठरते. जगात जेवढे थोर पुरुष होऊन गेले, सगळे साधेच होते. या उत्तुंग उद्योगपतीचे नाव ..'रतन टाटा'

खरंच, जगात जेवढी उत्तुंग माणसे होऊन गेली ती सगळी बोलायला, वागायला अत्यंत साधी..कुठलीही गुंतागुंत नसलेली.. अशी असतात.खरेतर...साधे राहणे हेच कठीण असते. व्यक्तींच्या जीवनाचे आपण अनुकरण करायला हवे...म्हणूनच, तुम्ही कोण आहात हे महत्वाचे नाही, तुम्ही कसे आहात याचा विचार करा.

★ ★ ★

## माहे फेब्रुवारी दिनविशेष

१ फेब्रुवारी – तटरक्षक दिन

४ फेब्रुवारी – जागतिक कर्करोग दिन

१२ फेब्रुवारी – जागतिक महिला आरोग्य दिन

१९ फेब्रुवारी – छत्रपती शिवाजी महाराज जयंती

२० फेबुवारी – जागतिक सामाजिक न्याय दिन

२१ फेब्रुवारी – आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन

२७ फेब्रुवारी – मराठी भाषा दिन

२८ फेब्रुवारी – राष्ट्रीय विज्ञान दिन

# वाचकांचा पत्रव्यवहार




प्रति,
मा. श्री. शेखरजी चरेगांवकर यांसी
अध्यक्ष, यशवंत बँक लि.,फलटण

आपला भव्य दिव्य मानस आज आकारत नावारूपास येत आहे. सर्वांसह पुढे मार्गक्रमणाचा आपला विचार ध्येयपूर्तीकडे नेणारा आहे. सद्सद् विवेक बुद्धीने होणारा विचार नक्कीच यशदायी आहे. आपली निस्वार्थी वृत्ती सदैव आपणांस प्रगतीच्या मार्गावरच नेणारी आहे. आपल्या कर्म मार्गाचेच नाव यशवंत आहे. त्यामुळे आपणांस यश सोडणारच नाही. आपण आपले कर्म करत असताना मी, माझेपण सोडले असल्यामुळे आपणाजवळ मनुष्यबळ जबरदस्त राहणार आहे. जनतेसाठी सदैव आपुलकीने राबविल्या जाणाऱ्या योजना स्तुत्य आहेत. जे जे आपणांसी ठावे, ते ते इतरांसी सांगावे, शहाणे करून सोडावे सकल जन। या उक्तीचे प्रत्यंतर आपणात आहे. अध्यात्माची कास आपण पकडून ठेवल्यामुळे एक दिव्य शक्ती आपल्या पाठीशी आहे यात तिळमात्र शंका नाही.
सदैव आपली, आपल्या कुटुंबियांची व बँकेची प्रगती होवो व प्रगतीचा आलेख उंचावत राहो हीच विठ्ठल चरणी प्रार्थना! आम्ही आपल्या बरोबर सदैव आहोतच.
धन्यवाद!

**य** ज्ञ मांडिला सत्कर्माचा

**श** तकानुशतके आनंद देण्याचा

**वं** दनीय स्तुत्य सर्व गोष्टींचा

**त** न मन धन ते अर्पिण्याचा

– सौ. अनुराधा गो. कुलकर्णी, कोयना वसाहत, कराड

प्रति,
मा. शाखा व्यवस्थापक
कराड.

मी व माझी फॅमिली यशवंत सहकारी बँकेचे फार पुर्वीपासुन छोटेशे खातेदार व ठेवीदार आहोत. बँकेच्या व्यवहारानिमित्त आपल्या संस्थेत वारंवार येत असतो. कोणताही छोटा मोठा ठेवीदार खातेदार हा कोणत्याही संस्थेमध्ये संस्थेचा एन.पी.ए. रेशो पाहुन येत नसतो, तर तो त्यास संस्थेमधील अधिकारी व सेवक वर्गाची आपुलकी व सेवा ह्या गोष्टींना आकर्षित होऊन, त्याच्या आयुष्याच्या बचतीची सुरक्षा मिळेल या अपेक्षेने येत असतो. सध्याच्या काळात ग्राहकास विनम्र सेवा मिळावी हीच अपेक्षा असते व आपल्या संस्थेमध्ये सर्व ग्राहकांना चांगली सेवा मिळते. येथुन पुढे विनम्र सेवा देणारी कार्यक्षेत्रे व संस्थाच टिकु शकतील.
या सर्व बाबींची पुर्तता आपल्या संस्थेमधील सर्व अधिकारी व सेवक अविरत बजावत आहेत. त्याबद्दल मला त्यांचा अभिमान वाटतो व मी त्यांचा गौरव करतो. आपल्या संस्थेतले सर्व पदाधिकारी व सेवक वर्गाने पुर्ण कार्यक्षमतेने अशीच संस्थेची भरभराट करावी हीच सदिच्छा.

आपला स्नेहांकीत
–श्री. बिपीनभाई पटेल







# क्षणचित्रे

१२ जानेवारी रोजी 'राष्ट्रीय युवक दिनानिमित्त' अर्थात 'स्वामी विवेकानंद जयंती' निमित्त बँकेच्या सर्व शाखांत स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व कर्मचारी वर्गाने अभिवादन केले.







फलटण शाखेतील वरिष्ठ अधिकारी श्री.राजू गायकवाड हे दि.३१ जानेवारी २०२२ रोजी निवृत्त झाले. श्री. गायकवाड साहेबांनी प्रदीर्घ काळ यशवंत बँकेत सेवा केली. अगदी सुरुवातीपासून काम केल्याने त्यांना शाखेतील सर्व कामाची माहिती होती. बँकेचा भूतकाळ आणि सुवर्णकाळ याचे ते साक्षीदार आहेत. बँकेतील जनरल लेजर ते सीबीएस सिस्टीम हा प्रवासही त्यांनी आत्मसात केला. अत्यंत प्रामाणीकपणे त्यांनी त्यांची प्रत्येक जबाबदारी निभावली. शांत, संयमी, अनुभवी सहकारी, मार्गदर्शक असणारे गायकवाड साहेब बँकेतून निवृत्त झाले आहेत. त्यांच्या भावी जीवनास अनेक शुभेच्छा.





# क्षणचित्रे

बँकेचे सभासद व ग्राहक श्री. सतीश गणेश काणे यांना सेवानिवृत्ती निमित्त कराड शाखेच्या वतीने श्री.राहुल कुलकर्णी व श्री.कन्हैया बागवडे यांनी शुभेच्छा दिल्या.



आपल्या बँकेचे सातारा शाखेचे अधिकारी किशोर किर्तीकुडाव यांनी बँकिंग क्षेत्रामधील CAIIB परीक्षा उत्तीर्ण होऊन यश संपादन केले आहे. त्यांचे अभिनंदन करताना बँकेचे ज्येष्ठ संचालक श्री. अवधूत नाटेकर (बाबूजी) व सेवकवृंद



आपल्या यशवंत बँकेच्या कराड शाखेंतर्गत चालू असणाऱ्या गजानन सोसायटी, रुक्मिणीनगर व कोयना वसाहत या ग्राहक सेवाकेंद्रांचा वर्धापनदिन दिनांक २७ जानेवारी २०२२ रोजी संपन्न झाला.











# बँकेच्या खास ठेव योजना

Reg.No. SAT/BNK/27/1975

## दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण

'आपली गुंतवणूक सुरक्षितता केवळ बँकेतच,
कारण येथे आहे कुटुंबातील प्रत्येकाला,
रूपये ५ लाखांचे ठेव विमा संरक्षण..'



मा. शेखर चरेगांवकर
अध्यक्ष, दि यशवंत बँक लि., फलटण

### * ठेवींवरील व्याजदर *

| अ.नं. | ठेव प्रकार | मुदत | व्याजदर |
|---|---|---|---|
| १ | सेव्हिंग्ज ठेव | | ३.५० % |
| २ | स्पेशल सेव्हिंग्ज् ठेव | | ६.५० % |
| ३ | चिरंजिव सेव्हिंग्ज् ठेव | | ३.५० % |
| ४ | पिग्मी ठेव | | ३.०० % |
| ५ | सुपर फ्लेक्सी ठेव | | ५.०० % |
| ६ | अल्प मुदत | किमान १६ दिवस ते ९० दिवस | ५.५० % |
| ७ | अल्प मुदत | ९१ दिवस ते १८० दिवस | ५.७५ % |
| ८ | अल्प मुदत | १८१ दिवस ते ३६४ दिवस | ६.०० % |
| ९ | मध्यम मुदत | १ वर्ष | ७.२५ % |
| १० | मध्यम मुदत | १३ महिने ते २४ महिने | ७.७५ % |
| ११ | मध्यम मुदत | २५ महिने ते ६० महिने | ८.०० % |
| १२ | मासीक व्याज योजना | ३ वर्षे व पुढे | ८.२५ % |
| १३ | मधुमित्र योजना | ३ वर्षे व पुढे | ८.२५ % |
| १४ | आधार (जेष्ठ नागरीक) | ३ ते ५ वर्षे | ८.५० %* |
| १५ | दामदुप्पट ठेव | | ८ वर्षे |
| १६ | दामदिडपट ठेव योजना | | ४ वर्षे २ महिने |

'अ' वर्ग सभासद किंवा जेष्ठ नागरीक यांना १ वर्ष व त्यापुढील कालावधीकरीताच्या ठेवींना ०.२५ टक्के जादा व्याजदर

सर्व शाखांमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत कॅश सुविधा देणारी बँक

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेला अथवा ग्राहक सेवा केंद्राला भेट द्या...

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | तांदुळआळी, सातारा |
| 8408802022 | 7875558491 | 9049633555 |

www.yashwantbank.com admin@yashwantbank.com

* ग्राहक सेवा हा आमचा विभाग नसून स्वभावच आहे. *



### सुपर 6 रिकरिंग ठेव योजना

सुपर 6

मुदत ६ महिने

दरमहा किमान रू. १०००/-

### विद्यालक्ष्मी आवर्त ठेव योजना

मुलांच्या शिक्षणासाठी अनोखी रिकरींग ठेव योजना

आपल्या पाल्यांचे शैक्षणिक भविष्य आजच सुरक्षित करूया.

### कुबेर मनी प्लस

मुदत ५ वर्षे

| दरमहा रक्कम | मिळणारी रक्कम | दरमहा रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|
| रू. 135/- | 10,000/- | रू. 680/- | 50,000/- |
| रू. 340/- | 25,000/- | रू. 1360/- | 1,00,000/- |

### धन संचय

दरमहा रू. १००/- व त्या पटीमध्ये
मुदत १ ते ५ वर्षे (अपघाती विमा संरक्षण रू. ५० हजार)

### अमृत संचय

दरमहा रू. ५००/- भरा व ६ वर्ष ६ महिन्यांनी घ्या
रू. ५०,०००/- (अपघाती विमा संरक्षण रू. ५० हजार)

### सुवर्ण संचय

दरमहा रू. १०००/- भरा व ६ वर्ष ६ महिन्यांनी घ्या
रू.१,००,०००/- (अपघाती विमा संरक्षण रू. १ लाख)

### मासिक व्याज योजना (MIS)

- मुदत ३ ते ५ वर्ष
- व्याजदर ८.५०% (दरमहा उत्पन्नाची हमी)
- ज्येष्ठ नागरिक वय - ५५ वर्षे

ज्येष्ठ नागरिकांचे सन्मानार्थ

### स्वराज्य ७५ संजीवनी ठेव योजना

लसीकरण प्रोत्साहनासाठी १३ महिने मुदतीची

| | |
|---|---|
| १ लस घेतलेल्या नागरीकांसाठी | व्याजदर ८.२५% द.सा.द.शे |
| २ लस घेतलेल्या नागरीकांसाठी | व्याजदर ८.५०% द.सा.द.शे |
| लस न घेतलेल्या नागरीकांसाठी | व्याजदर ८.००% द.सा.द.शे |

### महालक्ष्मी ठेव योजना

| | |
|---|---|
| १५१ दिवस | ७% |
| २५१ दिवस | ७.२५% |

### सभासद आरोग्य वर्धिनी योजना

एकरकमी दरवर्षी रू. १०००/- शेअर्स घेणाऱ्या सभासदांकरीता
सुरक्षितता... ठेवींबरोबर आरोग्याचीही..

* ज्येष्ठ नागरिकांना घरपोहोच बँकींग सेवा... *



# घर तुमचं हक्काचं... तुमचं स्वतःचं...

# गृहप्रवेश

## गृहबांधणी/खरेदी कर्ज योजना

नवीन फ्लॅट खरेदीसाठी/घर बांधणीसाठी/जुना फ्लॅट/घर खरेदीसाठी
तुमच्या सध्याच्या घराच्या दुरूस्तीसाठी/विस्तारासाठी
एन. ए. प्लॉट खरेदी व बांधकाम दोन्हीसाठी

प्रति लाखास
₹ १२००/-

पात्रता :
व्यावसायिक - वार्षिक उत्पन्नाच्या ४ पट
पगारदार - निव्वळ मासिक पगाराच्या ६० पट
शेती - वार्षिक उत्पन्नाच्या ४ पट

उत्पन्न कागदपत्रे :
व्यावसायिक - गत ३ वर्षाची आयकर विवरण पत्रके
पगारदार - पगारपत्रक, हमीपत्र
शेती - शेती उत्पन्नाची कागदपत्रे, बँक स्टेटमेंट

मुदत
१५ वर्षे

कमाल मर्यादा
₹. ५० लाख

आवश्यक कागदपत्रे :
मिळकतीशी संबंधित अद्ययावत कागदपत्रे,
७/१२ उतारा, सिटी सर्वे उतारा,
मूल्यांकन अहवाल

कायदेशी बाबी :
शोध अहवाल, कायदेशीर मत
आर्थिकदृष्ट्या सक्षम २ जामीनदार
आर्थिक कागदपत्रांसहीत.



प्रति लाखास
₹ २२२५/-

गाडी कोणतीही घ्या...
अर्थसहाय्य आम्ही करू...!

दुचाकी / चारचाकी वाहन खरेदीसाठी

# सुहाना सफर कर्ज योजना

२४ तासात कर्ज उपलब्ध

100 %
पर्यंत कर्ज उपलब्ध







आवश्यक कागदपत्रे :
गाडीचे कोटेशन, मुल्यांकन रिपोर्ट

आर्थिक कागदपत्रे :
व्यावसायिक - गत ३ वर्षाची आयकर पत्रके
पगारदार - पगारपत्रक हमीपत्र
शेती - शेती उत्पन्नाची कागदपत्रे
आर्थिकदृष्ट्या सक्षम २ जामीनदार.